रजि.नं. महा/0000122/2020
एफ/0019296/सांगली

# माणुसकी फौंडेशन

Reg. : F-0019296 (SNG)

# कुंडल

## माणुसकी फाउंडेशन कुंडल

**स्थापना उद्देश :**

समाजातील युवकांचे संघटन करून त्यांच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून विकासाचे पाऊल टाकण्याच्या हेतूने १९ फेब्रुवारी २०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून  कुंडल येथील युवकांच्या प्रेरणेतून माणुसकी फाउंडेशन कुंडल स्थापन करण्याचा उद्देश राहिला.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्यांनी कुंडल व कुंडल परिसरातून आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यामध्ये स्वातंत्र्यसैनिक क्रांतीसिह नाना पाटील, डॉ. जी. डी. बापू लाड, कॅप्टन रामभाऊ लाड, माझे आजोबा कृष्णाजी टकले महाशय, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, यांच्या क्रांतिकारी  विचाराचा आणि विकासाच्या प्रेरणेतून तसेच त्यांच्या समाज कार्याचा व स्वातंत्र्याचा वसा आणि वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी माणुसकी फौंडेशन कार्यरत ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्न केला. आणि २७ फेब्रुवारी २०१९ रोजी धर्मदाय आयुक्त सांगली या ठिकाणी फौंडेशन नोंदीसाठी प्रस्ताव नोंदवला गेला.

सदर फौंडेशन नोंदण्यासाठी चौडेश्वरी ब्लॉक एरिया हायस्कूल रोड कुंडल येथे १२ ते १५ जन मिटिंग साठी उपस्थित राहून फौंडेशनच्या पुढील कार्याच्या आणि उपक्रमाच्या बाबतीत आढावा बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.



माणुसकी फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष
श्री. विवेक अरुणा नारायण टकले



भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या
समवेत माझे आजोबा कृष्णाजी टकले (महाशय)





महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील
यांच्या समवेत माझे आजोबा कृष्णाजी टकले (महाशय) कुंडल

**डॉक्टर रत्नाप्पा ब्रम्हाप्पा कुंभार** हे एक भारतीय स्वतंत्र सेनानी होते. त्यांना सहकार महर्षी पण म्हणत, इचलकरंजी त्यांचे जन्मगाव भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे काम करत असताना भारतीय घटनेच्या मसुद्यावरती सही करणारे ते एक होते. माझे आजोबा **कृष्णाजी एकनाथ टकले** व **वडील नारायण कृष्णाजी टकले** राहणार कुंडल यांनी त्यांच्यासोबत स्वातंत्र्य सैनिक म्हणून काम केलेले आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्याचे योगदान मोठे आहे.






महिलांना स्वावलंबनासाठी प्रोत्साहन द्यावे : म्हैसकर

चौंडेश्वरी देवांग समाज अध्यक्षपदी नंदा म्हेत्रे




अण्णा हजारे यांना पाठिंबा

कुंडलला आमरण उपोषण सुरू



डॉ. रत्नाप्पा कुंभार



डॉ. रत्नाप्पा कुंभार

## संकल्पना धोरणे आणि उपक्रम

### १) पर्यावरण

अ) वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन

ब) स्वच्छता मोहीम

क) घनकचरा टाकाऊ पदार्थापासून खते तयार करण्याचा प्रकल्प राबवणे

ड) पाणी आडवा आणि पाणी जिरवा या मोहिमेसाठी परिसरामध्ये नाला बडिंग व शेततळे यासाठी बंधारे बांधणे.

### २) आरोग्य

अ) आरोग्य शिबीर,

ब) रक्तदान शिबीर

क) HIV, एड्स बाधीत युवकांना व महिलांना शासनाच्या योजना व उपचारासाठी सरकारी रुग्णालयामध्ये सेवा देणे.

ड) तात्काळ ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत Ambulance सेवा देणे.

इ) फिरता दवाखाना, तसेच आरोग्याबाबत जनजागृती मोहीम.

फ) योगा व प्राणायाम क्लास तसेच आहारतज्ञांचे युवकांना, महिलांना मार्गदर्शन करणे.

ग) व्यायामशाळा सुरु करणे.

### ३) शिक्षण

अ) दुर्लक्षित व वंचित घटकातील मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणणे.

ब) अनुसूचित जातीत व अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती जमातीमधील विध्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी शैक्षणिक साहित्य वाटप व शैक्षणिक उपक्रम राबवणे.

क) ग्रामीण भागातील युवकांना कौशल्यपूर्व शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे.

ड) युवक आणि युवती यांना उच्चशिक्षणासंबधी करिअर मेळाव्या माध्यमातून नोकरी संधी कोणत्या आहेत ते मार्गदर्शन करणे.

इ) अनाथ व एकल पालकत्व असणार्या हुशार गरजू विध्यार्थ्यांना शिक्षण आणि करिअर साठी दत्तक घेणे.

## ४) क्रीडा

अ) व्यायाम शाळा तयार करणे (जिम, कोरीडोर हॉल)

ब) ग्रामीण भागातील मुलामुलींना विविध खेळांचे मार्गदर्शन करणे उदा,. कबड्डी, खोखो, कुस्ती, सर्व ॲथलेटिक गेम्स.

क) तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय विविध खेळांचा स्पर्धा घेऊन खिलाडूवृत्तीतून खेळाडू तयार करणे.

## ५) सांस्कृतिक

अ) मुलामुलींना शिवकालीन खेळामध्ये दांडपट्टा, तलवारबाजी, लेझीम, ढोल- ताशा, या वाद्यांचे व खेळांचे मार्गदर्शन करणे व शिबीर भरवणे.

ब) गड किल्ले यांच्या संरक्षण, संवर्धन या मोहिमेतून विचारांच्या व संस्कारांच्या मुल्यांची जपणूक करणे.

क) वाचन, कला विविध विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करणे.

### कार्यपद्धत

१. समाजिक बांधिलकी जपत समाजसेवा करणे

२. निस्वार्थपणे

३. एखादे कार्य करताना विचार विनिमय पद्धतीने कार्य करणे.

### फाउंडेशन पहिले पाऊल

मी विवेक नारायण टकले. रा. कुंडल. आजोबांच्या स्वातंत्र्यसेनानी विचारातून आपल्या समाजामध्ये प्रबोधन करण्यासाठी आणि समाजाच्या विकासासाठी युवकांचे संघटन महत्वाचे आहे. म्हणून १५ जणांसोबत एक फाउंडेशन स्थापन करण्याचा विचार आणि कृतियुक्त अंबलबजावणी सुरु झाली. तत्पूर्वी वंचित बहुजन समाजाच्या विकासासाठी माझे याहीपूर्वी कार्य आणि प्रयत्न सुरु होते. म्हणजे मी सन २०१७ मध्ये SBC संघर्ष समिती पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडी अध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारत समाजसेवेचे काम सुरु राहिले आणि माणुसकी फाउंडेशन स्थापना १९ फेब्रुवारी २०१९ रोजी शिवजयंती औचीत्य साधून समाजकार्याची सुरवात झाली.







**विवेक टकले यांची निवड**

कुंडल, ता. ७ : पश्चिम महाराष्ट्र एस. बी. सी. संघर्ष समितीच्या युवक आघाडीच्या अध्यक्षपदी कुंडल येथील विवेक नारायण टकले यांची निवड झाली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत आमणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवड झाली. सांगली जिल्हा युवक आघाडीच्या अध्यक्षपदी मकरंद डाके यांची निवड झाली. नूतन पदाधिकारी यांचा देवांग विणकर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



**विवेक टकले, मकरंद डाके यांची निवड**

कसबे डिग्रज / वार्ताहर

विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) च्या पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडीच्या अध्यक्षपदी विवेक टकले, जिल्हा अध्यक्षपदी मकरंद डाके यांची निवड करण्यात आली. यावेळी एसबीसी संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत आमणे, राहुल म्हेत्रे, आकाश वागावकर आदी उपस्थित होते.



**विवेक टकले यांची प.महाराष्ट्र एस.बी.सी.संघर्ष समितीच्या युवक आघाडीच्याअध्यक्षपदी निवड**

कुंडल दि. ५ - पश्चिम महाराष्ट्र एस.बी.सी.संघर्ष समितीच्या युवक आघाडीच्या अध्यक्षपदी कुंडल येथील विवेक नारायण टकले यांची निवड झाली .संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत आमणे,यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवड झाली. सांगली जिल्हा युवक आघाडीच्या अध्यक्षपदी मकरंद डाके यांची निवड झाली. नूतन पदाधिकारी यांचा देवांग विणकर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. येत्या ७ ऑगस्टला विणकर दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्णय झाला.

## माणुसकी फाउंडेशन उपक्रम

१) १९ फेब्रुवारी २०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कुंडल परीसरातील १५ युवक एकत्र येऊन माणुसकी फाउंडेशन स्थापन करण्याचा निर्णय घेऊन त्याचं दिवशी समाजोपयोगी विविध उपक्रम तसेच प्राधान्याने पर्यावरण संरक्षण संवर्धन करण्याचा उद्देशाने वृक्ष लागवड करण्यासाठी वड, पिंपळ, लिंब अशा विविध प्रकारची ५० झाडे झरी पार्श्वनाथ डोंगर कुंडल या ठिकाणी लावण्यात आली आणि फाउंडेशनच्या माध्यमातून झाडांची संवर्धन निगा, संगोपन, देखभाल करण्याची पूर्णत: जबाबदारी फाउंडेशन च्या सदस्यांनी घेतली आणि प्रत्येक आठवड्यामध्ये दोनदा त्या झाडाला पाणी, खत घालणे, जबाबदारी घेऊन त्या पद्धतीने कृतीयुक्त नियोजन करण्यात आले.











२) विजय चोथे यांच्या वाढदिवसानिमित्त ५ झाडांचे वृक्षारोपण

माणुसकी फाउंडेशन सदस्य विजय चोथे यांच्या वाढदिवसानिमित्त २७ फेब्रुवारी २०१९ रोजी कुंडल परिसरामध्ये ५ वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच त्यांच्या संवर्धनातून पर्यावरण संरक्षण व्हावे. तसेच जागतिक तापमानवाढ व कार्बन उत्सर्जन यासारख्या समस्यावर वृक्षलागवड हाच एकमेव उपाय आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी वृक्ष महत्वाची भूमिका बजावतात. म्हणून प्रत्येक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड संकल्प व्हावे युवक व युवतीने व्यसनापासून दूर राहावे असा निश्चय विजय चोथे यांच्या वाढदिवसानिमित्त झाला.





३) सांगोला, जि. सोलापूर येथील फौंडेशन सदस्य, ओंकार सपाटे व सातारा याठिकाणी पोलीस सेवेत कार्यरत असणारे प्रशांत मोहिते आणि ओंकार हेंद्रे आमणापूर यांच्या वाढदिवसानिमित्त ठरलेल्या उपक्रमानुसार प्रत्येकी ५ वृक्ष लागवड करण्यासाठी पार्श्वनाथ जैन मंदिर कुंडल डोंगर परिसरात वृक्षलागवड करण्यात आली.













४) ८ मार्च २०२१ जागतिक महिला दिनानिमित्त कुंडल या ठिकाणी १० महिलांसमवेत फाउंडेशन युक्त संकल्पना पर्यावरण संरक्षण वृक्षलागवड करण्याच्या उद्देशाने युवक युवती तसेच महिलांचाहि समावेश राहिला. पर्यावरणपूरक इतर उपक्रम राबवण्यासाठी महिलांचाही सहभाग विकासासाठी राहिला आहे. फाउंडेशन च्या विकासासाठी महिला सदैव तत्पर असतात. भारती टकले, मनीषा तिटंबे, अरुणा टकले, वंदना चोथे, पूजा निवळे, रुपाली रंगाटे, आध्या टकले इतर महिला उपस्थित होत्या.





५) गणेश मोहिते पलूस आणि रॅश फायटर कराटे क्लब कुंडल, संस्थापक अध्यक्ष सचिन आवटे सर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. ठिकाण पार्श्वनाथ जैन मंदिर परिसर, कुंडल. उपस्थित सचिन टेके, अधिक वरुडे, शैलेश वीर, विजय चोथे, अजिंक्य आवटे, विवेक टकले, सुरज ढवळे, स्वप्नील गायकवाड, ओंकार चव्हाण, अनिकेत गायकवाड, प्रवीण गायकवाड.











६) श्री. संकेत श्रीराम वरुडे यांची दिनांक ९ मे २०१९ रोजी आरोग्य सेवा या फाउंडेशनच्या उद्देशाने मायणी ता.खटाव जि.सातारा येथील संकेत यांना कानाच्या पडद्याचा त्रास असल्याने ब्रिच कॅन्डी हॉस्पिटल मुंबई येथे शस्त्रक्रियेकरिता तत्कालीन केंद्रीय मंत्री सांगली जिल्ह्याचे खासदार प्रतिक दादा पाटील यांच्या खासदारनिधीतून व माणुसकी फाउंडेशन यांच्या संयुक्त मदतीने शस्त्रक्रिया करण्यात आली.



MINISTER OF STATE FOR COAL
GOVERNMENT OF INDIA
NEW DELHI

प्रति,

सप्रेम नमस्कार.....

महोदय,

कळावे,

आपला

प्रतिक प्रकाशबापू पाटील



७) माणुसकी फाउंडेशन कुंडल यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवत असताना इतर विकासाचे तसेच आरोग्यपूर्ण पर्यावरण पूरक तसेच समाजसेवा माध्यमांचे जे कार्यक्रम असतात त्याही कार्यक्रमात फाउंडेशनच्या सर्व सदस्यांचा सहभाग असतो. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार राजू खारगे यांच्या नेतृत्वात संपन्न झाला. तेव्हा या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. डी.वाय.एस.पी. कृष्णात पिंगळे (साहेब) यांनी आमच्या माणुसकी फाउंडेशनच्या विविध उपक्रमाबद्दल तसेच समाजसेवा करत असल्याबद्दल आमचा आणि माणुसकी फाउंडेशनचा गौरव आणि अभिनंदन करण्यात आले.







८) माणुसकी फाउंडेशन चा उपक्रम आणि संकल्पना की ज्या सदस्यांचे व त्यांच्या मित्र नातेवाईक यांचे वाढदिवस इतर नाहक खर्च न करता, पर्यावरण पूरक आणि संरक्षण संवर्धना करीता जागतिक तापमान वाढ नियंत्रण आणि स्वच्छता याकरिता वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन महत्त्वाचे आहे. म्हणून 13 जून 2022 रोजी विनायक जाधव व सागर गोयकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी 5 झाडे वीरभद्र डोंगर परिसरामध्ये लावण्यात आली आणि त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी फाउंडेशनने घेतली.







९) मा. श्री. विक्रम साळी (साहेब) डी.वाय.एस.पी. वर्धा यांच्याकडून सन 2022 - 23 या कोरोनाजन्य परिस्थितीत फाउंडेशन ने केलेल्या कामाचा गौरव आणि दखल यांच्याकडून घेण्यात आली. फाउंडेशन च्या वतीने त्यांचा स्वागत आणि सत्कार करण्यात आला. उपस्थित भाहुसो चव्हाण सर, गणेश तीटंबे, आदी लोक उपस्थित होते.





१०) वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेश गायगवाळे आणि सोनू पवार यांचे दिनांक 24 जून 2023 रोजी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना लक्षात घेऊन यांचाही वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. प्रथम टप्प्यात पर्यावरण व संरक्षण व संवर्धन हाच मुख्य उद्देश फाउंडेशनचा असल्याने वृक्षारोपण करण्यावर मुख्य भार राहिला होता.








११) सन 2019 साली आलेल्या कृष्णा आणि पंचगंगा नदीला पूर परिस्थितीत सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त लोकांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूचे किट, आरोग्याच्या दृष्टीने औषधे, कपडे, पाणी, फळे व रोख रक्कम स्वरूपात पूरग्रस्त लोकांना मदत करण्यात आली. तसेच या पूरग्रस्त परिस्थितीत लोकांना मदत करणारे आणि माणुसकी सेवेचे कर्तव्य बजावणारे महाराष्ट्र शासनाचे पोलीस यांनाही पाणीबॉटल. चहाबिस्किट आणि जेवण देण्यात आले.








१२) दिनांक 8 डिसेंबर 2023 रोजी कोल्हापूर वनपरिक्षेत्राचे मुख्याधिकारी सागर गवते (साहेब) यांनीही वृक्ष लागवड आणि संवर्धन करत असलेल्या कार्याबद्दल माणूसकी फाउंडेशन चा गौरव करण्यात आला. आणि सामाजिक वनीकरण अंतर्गत विविध उपक्रमांची चर्चा करण्यासाठी कोल्हापूर या ठिकाणी माणुसकी फाउंडेशनच्या सदस्यांची मीटिंग ठेवण्यात आली. तेव्हा सागर गवते साहेब यांचा वृक्ष आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत सत्कार करण्यात आला आणि त्यांच्याकडून फाउंडेशनच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.





१३) महाराष्ट्र राज्य टायगर ग्रुप अध्यक्ष पैलवान तानाजी भाऊ जाधव की जे व्यक्तिमत्त्व अखंड महाराष्ट्रभर समाजसेवेचे काम करत आहे. त्यांच्या ही प्रेरणेतून त्यांनी माणुसकी फाउंडेशन कार्याची दखल घेतली. आणि पर्यावरण संरक्षण संवर्धन मोहीम वृक्ष लागवड या फाउंडेशन कार्यक्रमास त्यांनी शुभेच्छा दिल्या. टायगर ग्रुप च्या वतीने 50 झाडे भेट दिली आणि कुंडल परिसरातील पार्श्वनाथ मंदिर परिसरात लावण्यात आली.







१४) समाजसेवा ग्रामीण बिगर शेती पतसंस्था मर्या. कुंडल यांचे अध्यक्ष संदीप माळी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमासोबत वृक्ष लागवड करण्याच्या उद्देशाने त्यांनी फाउंडेशनला 10 वृक्ष भेट दिली आणि फाउंडेशनच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थित सचिन भागवत, किरण निकम, केदार शिवपूजे, इतर सदस्य होते.






१५) माणुसकी फाउंडेशन च्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त फेब्रुवारी २०२३ मध्ये कोरोनाजन्य परिस्थितीच्या आढाव्यानुसार पलूस याठिकाणी मतीमंद मुलांची शाळे मध्ये ५७ विध्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. त्यामध्ये बिस्कीट, केक, सफरचंद, संत्री, केळी असे विविध प्रकारचे खाद्य वाटप करण्यात आले. आणि त्या दिवशी वर्धापन दिनानिमित्त पलूस तालुक्यातील गणेश मोहिते यांच्याहस्ते वृक्षलागवड करण्यात आली. बलवडी-भा परिसरात करंज, जांभूळ, वड, आंबे, इ,. फळे लागवड करण्यात आली. आणि त्याची जबाबदारी फाउंडेशन सदस्यांनी घेतली. या प्रसंगी अध्यक्ष विवेक टकले, गणेश मोहिते, दीपक पवार, बबलू पवार, पवन तीटंबे, गणेश शीरतोडे, नइम मुलानी, आणि इतर मित्रपरिवार उपस्थित होते.









१६) माणुसकी फौंडेशनच्या वतीने कोरोनाजन्य विषाणूच्या प्रादुर्भावाने संसर्ग लागण होताच लॉकडाऊन परिस्थिती राहिली. लॉकडाऊनमुळे उसतोड मजुरांच्या कामगारांच्या कामाचा, मजुरांच्या पोटाचा प्रश्न निर्माण झाला. परिसरात उसतोड मजूर कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे कीट वाटप माणुसकी फाउंडेशनवतीने करण्यात आले. समाजसेवेच्या वतीने समाजातील जबाबदारी आणि कर्तव्य पार पाडत सेवेचा वसा आणि वारसा फाउंडेशन चालवत आहे. यावेळी कुंडल पोलीस ठाण्याचे निरीक्षक एस.एस.माने मॅडम व वरिष्ठ अधिकारी सह. अधीक्षक मनीषा दुबाले मॅडम उपस्थित होत्या.



**माणुसकी फाऊंडेशनतर्फे ऊसतोड मजुरांना जीवनावश्यक वस्तुंचे किट वाटप**

कुंडल : प्रतिनिधी

जगभरात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे थैमाण घातले असताना भारतात देखील कोरोनाचा संसर्ग वाढत्याने फाइत असल्याचे चित्र आहे. भारत सरकारने याबर उपाययोजना म्हणुन देशभर लॉकडाऊन घोषित केला आहे.

लॉकडाऊनमुळे ऊसतोडणी कामासाठी आलेल्या मजुरांच्या पोटाचे हाल होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने सांगली जिल्ह्यातील कुंडल येथे माणुसकी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने एक कर्तव्य व जबाबदारी म्हणुन येथील साठेनगर परीसरात राहणाऱ्या ऊसतोड मजुर कामगारांना जीवनावश्यक वस्तुंचे कीट वाटप माणुसकी फाऊंडेशनचे पदाधिकारी व कुंडल पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरिक्षक एस. एस. माने तसेच धावत्या दौऱ्यासाठी आलेल्या वरिष्ठ अधिकारी सहाय्यक अधिक्षक मनिषा दुबुले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सोशल डिस्टन्सिंगचे काटेकोर पालन करत माणुसकी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक टकले, मोहसिन जमादार, ओंकार दिवटे, नईम मुलानी, पवन तिटंबे, हे पदाधिकारी उपस्थित होते.



**ऊसतोड मजुरांना किट वाटप**

कुंडल, ता. २१ : लॉकडाउनमुळे अडकलेले ऊसतोडणी मजूर यांना कुंडल येथे माणुसकी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने एक कर्तव्य व जबाबदारी म्हणून येथील साठेनगर परिसरात राहणाऱ्या ऊसतोड मजूर कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले. माणुसकी फाऊंडेशनचे पदाधिकारी व कुंडल पोलिस ठाण्याच्या एस. एस. माने तसेच धावत्या दौऱ्यावर आलेल्या वरिष्ठ अधिकारी, सहायक अधीक्षक मनीषा दुबले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विवेक टकले, मोहसिन जमादार, ओंकार दिवटे, नईम मुलानी, पवन तिटंबे हे पदाधिकारी उपस्थित होते.





१७) कोयना वसाहत पलूस या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचे कीट वाटप करण्यात आले. प्रमुख उपस्थिती नायब तहसीलदार राजेंद्र पोळ साहेब होते. तसेच पलूस योगेश रसाळ, ओंकार दिवटे उपस्थित होते.








१८) दालमिया भारत शुगर इंडस्ट्रीज शिराळा याठिकाणी कोरोनाजन्य परिस्थितीत मजूर लोकांना ओंकार दिवटे,पाटील साहेब व अन्य सहकारी यांच्या मदतीने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



१९) माणुसकी फाउंडेशनच्या वतीने कोरोना परीस्थितीत रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे रक्ताची उणीव भासत आहे. म्हणून माणुसकी फाउंडेशन च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्या ठिकाणी ५६ लोकांनी रक्तदान केले. मिरज लॉजिकल इन्स्टिट्यूट व वैभव चौगुले, योगेश रसाळ यांनी रक्तदान शिबिरसाठी सहकार्य केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. आणि परिसरातील अनेक तरुणांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी दीपक लाड, वन्यखात्याचे अधिकारी जितेंद्र गुजले, गणेश टकले, निलेश गळगे इ. उपस्थित होते.

१८ मे २०२०

## कुंडल येथे बुधवारी रक्तदान शिबीर

कुंडल : वार्ताहर

येथील माणुसकी फाँडेशन कुंडल यांच्यावतीने बुधवार, दि. २० रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत चौंडेश्वरीनगर येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

लॉकडाऊनमुळे सर्वत्र रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे सर्वजण घरी असल्याने रक्तपेढ्यांमधील रक्तसाठा संपला आहे. कोरोना रुग्ण वाढत आहेत, त्यांना रक्ताची गरज असल्याने माणुसकी फाँडेशनतर्फे रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. तरी या शिबिरास रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. रक्तदान शिबिरसाठी विवेक टकले (९५९५०९०९०९), मोहसीन जमादार (७२७२०२८६८६) यांच्याशी संपर्क साधावा.

## माणुसकी फाउंडेशनच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद



कुंडल, दि.२६ (वार्ताहर) – येथील माणुसकी फाउंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. कोरोना १९ या आजारामुळे रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे रक्ताची गरज भासत आहे म्हणून माणुसकी फाउंडेशन ने रक्तदान शिबिराचे आयोजन केले त्यास परिसरातील अनेक तरुणांनी आणि चांगला प्रतिसाद दिला.

यावेळी रणसंग्राम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक लाड, वनखात्याचे अधिकारी जितेंद्र गुजले , गणेश टकले, निलेश गळगे,आदी तरुण मोठ्या संख्येने हे उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी माणुसकी फाउंडेशनचे अध्यक्ष विवेक टकले, उपाध्यक्ष मोहसीन जमादार, शैलेश वीर, गणेश शिरतोडे, अजिंक्य आवटे आदि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. मिरज लॉजिकल इंस्टिट्यूट व वैभव चौगुले , योगेश रसाळ यांनी रक्तदान शिबिरासाठी मोठे सहकार्य केले.

## माणुसकी फौंडेशन कुंडलच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न





२०) कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे ८ जून २०२० रोजी भाळवणी  ता. कडेगाव या ठिकाणी या ठिकाणी शिबिर आयोजित करण्यात आले. सातत्याने आरोग्यपूर्ण सेवेसाठी फाउंडेशन सदैव तत्पर असून कोरोना लॉकडाऊन कालावधीत रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात होता, त्यावेळी डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक पैलवान युवकांच्या प्रेरणेतून 63 युवकांनी रक्तदान केले. रक्तपेढी मिरज या ठिकाणा हुन आलेली होती.







२१) माणुसकी फाउंडेशन समाजसेवेच्या माध्यमातून समाजातील वृद्ध महिला बालक आणि युवक यांच्या आरोग्य तपासणीचे शिबिर मोफत आयोजन प्रत्येक वर्षी सातत्याने करत असते. या वैद्यकीय सेवेमध्ये ज्या डॉक्टरांचा मदतीचा हात असतो. त्यामध्ये भोसले डॉक्टर आणि मॅडम, डॉक्टर बाबर, डॉ. खारगे यांना वृक्ष भेट देऊन ०१ जुलै हा डॉक्टर डे फाउंडेशनच्या वतीने साजरा करण्यात आला.









२२) माणुसकी फाउंडेशन सातत्याने समाजसेवा आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने कार्यरत असते. याचेच औचित्य साधून 15 ऑगस्ट 2020 रोजी जिल्हापरिषद सदस्य शरद (भाऊ) लाड, ग्रामपंचायत कुंडल च्या सरपंच प्रमिलाताई पुजारी व यांच्या मदतीने कुंडल परिसरातील पार्श्वनाथ मंदिराजवळ परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. जागतिक तापमान वाढ, कार्बन उत्सर्जन कमी करणे, प्रदूषण नियंत्रण यासाठी वृक्ष लागवड महत्त्वाची आहे. म्हणून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाची जबाबदारी फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आली.









२३) सर्वसामान्य जीवन जगणारे आणि जीवनाचा आधार कोठेही न मिळालेल्या अन्न वस्त्र निवारा या तिन्ही प्राथमिक गरजा पूर्ण न होऊ शकलेल्या सांगली गणेश नगर या ठिकाणी 11 मे 2023 रोजी अध्यक्ष विवेक टकले यांच्या वाढदिवसानिमित्त बेघर, निराधार मुलांसोबत केक कापून त्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



२४) कुंभारगाव रोड वीज बोर्ड जवळ कुंडल या ठिकाणी माणुसकी फाउंडेशनच्या वतीने दिवाळीनिमित्त 2023 ऑक्टोबर महिन्यामध्ये ऊसतोड मजूर कामगारांना फराळ वाटप करण्यात आले. तसेच लहान मुला मुलींना नवीन ड्रेस भेट वाटप करण्यात आले. अशा 15 मुला-मुलींना नवीन ड्रेस भेट देण्यात आले. अशा मजूर कामगारांचा आनंद द्वीगुणीत झाला. याप्रसंगी मनसे अध्यक्ष विशाल शिंदे, माणुसकी फाउंडेशन अध्यक्ष विवेक टकले, ऋषिकेश खारगे सर, शैलेश वीर, पवन तीटंबे, सुहास जगताप, विनायक जाधव, अभिजीत कोळी, मोहसीन जमादार व इतर अन्य उपस्थित होते.











२५) 13 डिसेंबर 2020 रोजी समाजामध्ये कार्य करत असणाऱ्या वृक्ष लागवड, शैक्षणिक साहित्य भेट, विद्यार्थी पालक योजना, मजूर कामगारांना कपडे वाटप, वाढदिवसानिमित्त फराळ वाटप, रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी शिबिर अशा विविध कार्याबद्दल स्वामी विवेकानंद सोशल फाउंडेशन आष्टा यांच्या वतीने **विशेष गौरव “प्रेरणा” पुरस्कार** देण्यात आला.







२६) संजय डाके राहणार कुंडल यांच्या खुब्याचे ऑपरेशन करण्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतीक दादा पाटील यांच्या खासदार फंडातून व माणुसकी फाउंडेशन यांच्या मदतीने भाटीया हॉस्पिटल मुंबई या ठिकाणी उपचार करण्यात आला.



प्रतिक प्रकाशबापू पाटील
PRATIK PRAKASHBAPU PATIL

MINISTER OF STATE FOR COAL
GOVERNMENT OF INDIA
NEW DELHI-110001

दिनांक - 27/ /2019

प्रति,

सप्रेम नमस्कार...

महोदय,

कळावे,

आपला

प्रतिक प्रकाशबापू पाटील



२७) माणुसकी फाउंडेशन चा चौथा वर्धापन दिन फेब्रुवारी 2024 रोजी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशा रक्तदान शिबिराचे आयोजन प्रत्येक वर्षी करण्यात येते. कारण समाजातील रुग्णसेवेसाठी कटिबद्ध असणारे तसेच ज्या रुग्णांना रक्ताची गरज आहे. अशा रुग्णांना रक्तपेढीतून रक्त पिशवी मदत केली जाते. आज अखेर बऱ्याच रुग्णांना या फाउंडेशन च्या माध्यमातून जीवनदान मिळाले आहे. आरोग्यपूर्ण कार्यक्रम घेण्या पाठीमागचा हेतू हाच की सर्वसामान्य रुग्णाच्या सेवेतून त्यांना जीवनदान मिळावे. रक्तदान शिबिर हा वर्धापन दिनाचा मुख्य भाग राहिला आहे. या रक्तदान शिबिर मध्ये 72 जणांनी रक्तदान करून उस्फूर्त प्रतिसाद दिला.









२८) वन्यजीव संरक्षण संवर्धन व्हावे या उद्देशाने फाउंडेशन च्या वतीने जे टाकाऊ पदार्थ, पाण्याच्या बाटल्या व पत्र्याचे डबे यामधून निसर्गातील पक्षांना निवारा पाणी तसेच त्यांना धान्य खाता यावे यासाठी कुंडल परिसरातील शंभर वृक्षांना त्या डब्यापासून तयार केलेल्या निवारगृहामध्ये त्यांना अन्नधान्य व पिण्याच्या पाण्याची सोय फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली. समाज उपयोगी विविध उपक्रमा सोबतच फाउंडेशन निसर्गातील जो जीव आहे त्याचीही काळजी घेतो. याचे आलेले पक्षांना निवासस्थानासाठी हा संकल्प उपक्रम करण्यात आला सोबत विजय चोथे, रितेश गलांडे, पवन तीटंबे, अजिंक्य आवटे, विवेक टकले उपस्थित सदस्य.










२९) 5 जून 2024 जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वड, पिंपळ, सुचीपर्णी, कडुलिंब अशा विविध प्रकारच्या वृक्ष लागवड कुंडल पार्श्वनाथ मंदिर परिसरात करण्यात आली. जागतिक तापमान वाढ, कार्बन उत्सर्जन कमी करणे, प्रदूषण नियंत्रण स्वच्छता मोहीम या घटकांसाठी वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन महत्त्वाचे आहे. म्हणून फाउंडेशनच्या वतीने मुख्य भर हा पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष लागवड करणे हा आहे. जवळपास 32 वृक्षांची लागवड करण्यात आली.








३०) आदिवासी विकास मंत्री नरहरी झिरवळ साहेब यांचे कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर या ठिकाणी भेट झाली. फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांबाबत त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी फाउंडेशनला जे काही सहकार्य लागेल ते देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आणि फाउंडेशनच्या इतर सर्व कार्यसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.






३१) सामाजिक बांधिलकी जपत लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यामध्ये नीतिमूल्य आणि संस्काराची रुजवणूक करत असताना ज्या मुलांमध्ये क्रीडा संपन्न गुण निर्माण व्हावेत, त्यांच्यात खेळाडू वृत्ती निर्माण व्हावी या प्रेरणेतून ज्या विद्यार्थ्यांनीनी वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात यश संपादन केले त्यांच्या गुणगौरव नेहमीच फाउंडेशनच्या वतीने करण्यात येतो. श्लोक दत्तात्रय साळुंखे वय दहा वर्षे "**राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक**" मिळवल्याबद्दल फाउंडेशन च्या वतीने त्याचा पेन, वही, पुस्तक आणि झाड देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.





३२) स्पर्धा परीक्षा क्षेत्रात करिअर करण्यासाठी माणुसकी फाउंडेशनच्या वतीने प्रत्येक वर्षी 10 विद्यार्थी दत्तक घेण्याचा कल्पनेतून सन 2023 मध्ये राजश्री शाहू स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी इस्लामपूर मध्ये एम.पी.एस.सी. क्लास साठी रितेश हरिराम चौधरी मु.पो. बेलाती कवलेवाडा जी. गोंदिया, पृथ्वीराज खांडेकर, प्रदीप कांबळे, दिनकर लोंढे, किरण चौगुले, या पदवीधर युवकांना त्यांच्या शैक्षणिक करिअर साठी माणुसकी फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण व राहण्याची सोय दोन वर्षासाठी दत्त घेतले. त्यामधून रितेश चौधरी या विद्यार्थ्यासाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट देण्यात आली, त्यातून त्याचे आयसीआयसीआय बँकेत ऑफिसर आणि इंडियन नेव्ही पदी निवड झाली.










३३) माणुसकी फाउंडेशन कुंडल जे विकसित उपक्रम राबवते त्या सर्व कार्यक्रमाची दखल आणि गौरव करण्याचे काम माननिय श्री. डी.वाय.एस.पी. कवडे (साहेब) यांनी केलेले होते. तसेच त्यांची जेव्हा उच्च पदावरती निवड झाली, तेव्हा फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांचे वेळोवेळी फाउंडेशन साठी मदत व सहकार्य असते.







३४) दीपिका मुसळे मॅडम पी.एस.आय. राहणार इचलकरंजी यांचे सातारा-कोरेगाव या ठिकाणी बदली झाली. सामाजिक बांधिलकी जपत देशाच्या सेवेसाठी त्यांचे कार्य कर्तव्य तत्परता खूप मानाची होती. त्यांना समाजसेवेची आवड असल्याने त्यांचा फाउंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.







३५) 25 जून सुवर्णामाई बागल प्रदेश सचिव महिला राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र राज्य, संस्थापक अध्यक्षा सुवर्णा फाउंडेशन पंढरपूर. यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जाधव नगर कुंडल क्रांती कारखानाच्या पाठीमागे बेघर मजूर वसाहतीतील लोकांना जीवनावश्यक वस्तूचे कीट वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. तसेच अनेक ज्या महिला एकत्र आल्या होत्या त्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. व कोरोनाजन्य परिस्थितीत पलूस तालुक्यातील विविध ठिकाणी मास्क आणि सॅनिटायझर चे वाटप करण्यात आले, याप्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष विवेक टकले, सदस्य योगेश रसाळ, विजय चोथे व इतर महिला उपस्थित होत्या.



## राष्ट्रवादीच्या सचिव सुवर्णा बागल यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

आष्टा, दि. १ : राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशच्या महिला सचिव व सुवर्ण फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सुवर्णा (माई) बागल यांच्या वाढदिवसानिमित्त माणुसकी फाउंडेशन, कुंडल यांच्याकडून विविध उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी कुंडल येथील पार्श्वनाथ मंदीराच्या पायथ्याशी चार पिंपळ वृक्षारोपण करण्यात आले. तसेच फाउंडेशनकडून कुंडल येथील जाधवनगर येथे २१ गरजु कुटुंबांना १५ दिवस पुरेल इतके जीवनावश्यक वस्तुंचे कीट वाटप करण्यात आले.

तसेच पलुस येथील कार्यरत असलेले पोलिस आणि होमगार्ड यांना मास्क व सॅनिटायजरचे वाटप युवा नेते योगेश दादा रसाळ यांच्या हास्ते करण्यात आले. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या मुलांना पुस्तकाचे वाटप करण्यात आले. महीला बचत गटामार्फत माईच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

अशा विविध उपक्रमांनी माईंचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सर्व माणुसकी फाउंडेशनचे सभासद उपस्थित होते.







३६) माणुसकी फाउंडेशन सामाजिक सेवेसोबतच आध्यात्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य सुरूच होते. सन 2024 मध्ये जेव्हा आयोध्या या ठिकाणी राम मंदिर स्थापना करण्याचे नियोजित प्रकाशित होते आणि राम मंदिर ची स्थापना झाल्यानंतर 22 जून रोजी पुणे या ठिकाणी हडपसर गाडीतळ येथे 52 किलो लाडू वाटप करून हिंदू धर्म श्रीराम यांच्या जयघोषित सर्व भक्त जणांना लाडू वाटप करण्यात आले.











३७) दरवर्षी शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम फाउंडेशन च्या वतीने करण्यात येतो की जेणेकरून प्रत्येक जो शिक्षणापासून वंचित आणि दुर्लक्षित आहे त्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणून त्याचे संपूर्ण सर्वांगीण विकास आणि विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकासासाठी आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना चिखलदरा, अमरावती, मेळघाट या ठिकाणी 110 विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्यामध्ये वही, कंपास पेटी, पेन्सिल, पेन, शालेय दप्तर अशा साहित्याचे वाटप करण्यात आले.









३८) मेळघाट अमरावती या ठिकाणी महाराष्ट्रातील समाजसेविका सिंधुताई सपकाळ ज्यांचे अनाथ मुला-मुलींच्या शिक्षणासाठी तसेच त्यांच्या सर्वांनी विकासासाठी प्रयत्न करणारे त्यांचे चिरंजीव अरुण भाऊ सकपाळ यांचे आदिवासी विभाग प्रत्यक्ष स्थळी पाहणी शिबिरामध्ये त्यांची ही भेट घेण्यात आली.







३९) अध्यात्मिक क्षेत्रात फाउंडेशनचे कार्य उल्लेखनीय आहे संत ज्ञानेश्वर पालखी आषाढी वारी एकादशी निमित्त ज्यावेळी वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांना पुणे उरळी कांचन या ठिकाणी भाविक भक्तांना आणि वारकऱ्यांना पाणी बॉटल तसेच प्रसाद म्हणून फळे वाटप करण्यात आले. माणुसकी फाउंडेशन पुणे सदस्य विराज, राहुल, नागेश, आकाश, गणेश.








४०) सामाजिक न्याय विभागाचे केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांची 2023 मध्ये कवठेमहांकाळ या ठिकाणी यांची भेट झाली. आणि समाजातील विविध विकसित उपक्रमांबाबत तसेच महाराष्ट्र शासनाच्या दुर्लक्षित आणि उपोक्षित वंचित वर्गाच्या विकासासाठी असणाऱ्या सर्व योजनांचा फाउंडेशनच्या माध्यमातून प्रकल्प राबवण्याचे नियोजन राहिले असून त्यांच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर याबाबत चर्चा करण्यात आली.



४१) आमचे बंधू विनायक सपाटे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड व गडचिरोली या नक्षलग्रस्त्र जिल्ह्यामध्ये उत्कृष्ट पोलीस अधिकारी म्हणून कार्य केल्याबद्दल माणुसकी फाउंडेशन च्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आले. सध्या ते कोल्हापूर पोलीस मुख्यालय या ठिकाणी सेवेत आहेत.



४२) शैक्षणिक क्षेत्रात आपल्या अध्यापनाचा ठसा त्या क्षेत्रामध्ये उमठवत मुला-मुलींना शिकवण्याचे काम करणारे प्राध्यापक सर्जेराव खरात (सर) राहणार आंधळी क्रांती अग्रणी. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल या ठिकाणी मराठी विषयाचे अध्यापन करत असून ग्रामीण भागातील कथाकथनकार यांचे विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान होतात. की जेणेकरून समाज प्रबोधन काय होत आहे सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम खरात सर करत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड व वृक्ष भेट देऊन  त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.








४३) बुर्ली या ठिकाणचे मा. श्री. हेमंत (अण्णा) पाटील जिल्हा परिषद सदस्य पलूस गट, एक सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवेचे व्रत तसेच युवकांना उद्योजकाच्या माध्यमातून प्रेरणास्त्रोत असणारे व्यक्तिमत्व सातत्याने फाउंडेशनला मार्गदर्शन व सहकार्याची भावना असते. त्यामुळे हेमंत अण्णा यांचाही वाढदिवसानिमित्त वृक्ष भेट देऊन वृक्ष लागवड करण्यात आली.







४४) चांदणी ताई कोरे संस्थापक अध्यक्ष निर्भया आनंदी जीवन संस्था पुणे या समाजामध्ये असणाऱ्या तृतीयपंथी महिलांसाठी तसेच त्यांना न्याय मिळवून देण्या साठी व उपजीविकेच्या उदरनिर्वाहासाठी त्यांचे काम सुरू आहे. तसेच चांदणी ताई गोरे यांनी समाजातील निराधार महिला तसेच अनाथ मुले-मुली यांचा उदरनिर्वाह त्यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी त्याची संस्था घेत असून माणुसकी फाउंडेशनच्या वतीने त्यांच्याही संस्थेस आर्थिक तसेच शैक्षणिक साहित्य वाटप त्या विद्यार्थ्यांना करण्यात आले.















४५) आदिवासी विभागामध्ये मेळघाट अमरावती समाजसेवेचे काम करणारे की ज्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पद्मश्री पुरस्कार देण्यात आला डॉ.स्मिता कोल्हे व डॉ रवींद्र कोल्हे यांनी आदिवासी भागातील मुलामुलींचे कुपोषण, त्यांना शिक्षण, महिलांना बचत गटाच्या माध्यमातून लघु उद्योग व कुटीर उद्योग प्रशिक्षण देण्याचे काम या महान दांपत्याकडून होत आहे. सातपुडा पर्वतातील दारिद्र्याने विखुरलेल्या आणि आजाराने ग्रासलेल्या गावात दवाखान्याच्या माध्यमातून औषधोपचार व अवघड महिलांची बाळंतपण, शिक्षण, उत्सव, शेती प्रयोग या सर्व माध्यमातून प्रबोधनाचे कार्य त्यांनी केल्याबद्दल समाजसेवेची प्रेरणा आणि त्यांना भेटण्याचा योग मेळघाट शिबिरामध्ये झाला.











४६) मतिमंद मुलांची शाळा वाघजाई वाडी ता. कोरेगाव या ठिकाणी समाजातील जो दिव्यांग वर्ग आहे त्यांनाही आपल्या जीवनाचा उपभोग घेता यावा तसेच त्यांच्याही आनंदमय जीवनासाठी माणुसकी फाउंडेशन सतत कार्यरत आहे त्या शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या आरोग्य शिबिर तसेच शिक्षणासाठी आणि त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व मनोरंजनासाठी विविध खेळाच्या प्रकारचे साहित्य तसेच या विद्यार्थ्यांना खाऊ वाटपामध्ये बिस्किट, फळे, केळी इत्यादी वाटप करण्यात आले. सातत्याने माणुसकी फाउंडेशनचे  काम समाजातील विविध वर्गाच्या विकासासाठी चालू असते. त्यातील दिव्यांगांचा विकास हेच या कार्यक्रमाचे औचित्य आहे.











४७) आमचे मित्र विनय सपकाळ जय हनुमान ग्रुपचे अध्यक्ष यांची जिल्हा दक्षता नियंत्रण समिती सांगली सदस्य पदी निवड झाल्याबद्दल सत्कार माणुसकी फाउंडेशन च्या वतीने करण्यात आला. यांचे समाज विकासासाठी विविध उपक्रम राबवून सर्वांगीण विकास आणि समाजाच्या विकासाचे ध्येय यांच्याकडून जबाबदारीने पार पाडले जात असते. म्हणून फाउंडेशन च्या वतीने त्यांचा वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विनायक गोरे, संतोष जाधव आणि अध्यक्ष विवेक टकले उपस्थित होते.







४८) आमचे मित्र अजय लोटके पीएसआाय पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना उपस्थित गौरव खेतमर इस्लामपूर आणि अजिंक्य आवटे, अध्यक्ष विवेक टकले.











४९) समाजातील महिलांना उद्योगाचे प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने माणुसकी फाउंडेशन कार्यरत आहे. यामध्ये महिलांना ब्युटी पार्लर, मेकअप आर्टीस्ट, फॅशन डिझायनिंग असे मार्गदर्शन सौ. राजश्री भरते मॅडम राहणार कोरेगाव यांच्या मार्गदर्शनातून 54 महिलांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यात आले. महिलांचा विकास व्हावा हेच फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे.





५०) आमचे बंधूतुल्य सौरभ रंगाटे उपजिल्हाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल माणुसकी फाउंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.











५१) विधानसभा भोसरी मतदार संघाचे विद्यमान आमदार महेश (दादा) लांडगे यांची भोसरी या ठिकाणी भेट घेण्यात आली. तसेच समाजाच्या विविध विकासांचे उपक्रम, युवकांचे संघटन, त्यांना बेरोजगारी प्रश्नाबाबत पुण्यामधील विविध कंपन्यांमध्ये नोकरी साठी मार्गदर्शन, ग्रामीण भागामध्ये गोशाळा तयार करणे, शिवजयंती आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे नियोजन करून त्यांच्या विचारांचे प्रबोधन करण्यासाठी दादांशी चर्चा व सदिच्छा भेट.





५२) माणुसकी फाउंडेशन अध्यक्ष विवेक टकले यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड करून साजरा करताना.













५३) आद्या श्रीगणेश टकले इयत्ता पहिली तिचा सहावा वाढदिवस इतर अपवय्य खर्च टाळून फाउंडेशनच्या माध्यमातून तिच्या वर्गातील मुला-मुलींना खाऊ आणि पाटी पेन्सिल वाटप करून साजरा करण्यात आला. तिच्यापुढे समाजकार्याचा एक आदर्श ठेवण्यात आला.





५४) मा. श्री. संदीप आमने (साहेब) यांची पी.एस.आय. पदी निवड झाल्याबद्दल सत्कार व पुणे येथे सेवेत रुजू असताना सदिच्छा भेट सोबत आकाश कांबळे.





५५) माननीय श्री. मंगेश जी चिवटे (साहेब) प्रमुख मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी महाराष्ट्र राज्य शिवसेना शिंदेगट अखंड महाराष्ट्रभर आरोग्य खात्याच्या असणाऱ्या सर्व योजना रुग्णसेवक व आरोग्यदूत म्हणून कार्य पार पाडणारे तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (साहेब) यांचे स्वीसहाय्यक निरोप कार्यकारी अधिकारी यांची कोल्हापूर या ठिकाणी माणुसकी फाउंडेशन बद्दल करत असलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला.



५६) शंभूराजे बाळासाहेब पाटील यांची मंत्रालय महसूल सहाय्यक पदी निवड झाल्या बद्दल माणुसकी फाउंडेशन च्या वतीने राजर्शी शाहू प्रबोधिनी या ठिकाणी सत्कार करण्यात आला. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागामध्ये लिपिक म्हणून कार्यरत आहे. सत्कार प्रसंगी फाउंडेशन अध्यक्ष विवेक टकले, विनय केंगार, मंगेश कांबळे, सुधीर एडके व इतर मान्यवर उपस्थित होते.










५७) 5 जून 2025 जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माणुसकी फाउंडेशन च्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये पर्यावरण संवर्धनाचे महत्व आणि प्लास्टिक प्रदूषण तसेच कचरा व्यवस्थापना सारख्या गंभीर समस्यांवर जनजागृती करण्यात आली.











५८) दसरा सणानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप श्रेया सुरेश रणखांबे ईश्वरपूर या विध्यार्थीनिस इयत्ता अकरावी आर्ट्स पुस्तक संच भेट देण्यात आला. या प्रसंगी नवनियुक्त महिला अध्यक्ष सौ. ज्योतीताई साळुंखे, विवेक टकले (अध्यक्ष), लक्ष्मी टकले, प्रा. विनय केंगार, प्रा. आशिष घस्ते माणुसकी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य







**दि. ०२ ऑक्टोंबर वार : गुरुवार**

५९) माणुसकी फौंडेशन, महीला अध्यक्ष ज्योती ताई दत्तात्रय साळुंखे याच्या वतीने मकर संक्रांती निम्मीत पेठ येथील आशा स्वयंसेवीका आणि बचतगटातील महीलांसाठी हळदी कुंकु समारंभ पार पडला.












दि. २४ जानेवारी वार : शनिवार


माणुसकी फौंडेशन, महाराष्ट्र राज्य
हळदी-कुंकू













## ६०) माणुसकी फौंडेशन आयोजित वाढदिवसानिम्मीत सदगुरू आश्रमशाळेमध्ये जिवनावश्यक वस्तुंचे साहित्य वाटप






पुढारी

संक्षिप्त

### सद्गुरू आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बसकर पट्ट्यांचे वाटप



प्रभात

### सद्गुरू आश्रमशाळेत मुलांना बसकर पट्ट्यांचे केले वाटप

माणुसकी फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम



### सद्गुरु आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बसकर पट्ट्यांचे वाटप
माणुसकी फाउंडेशन चा सामाजिक उपक्रम

### सद्गुरु आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बसकर पट्ट्यांचे वाटप

■ बंधुता न्यूज नेटवर्क

शिराळा : माणुसकी फाउंडेशनच्या वतीने ईश्वरपूर येथील सद्गुरु आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना बैठक व्यवस्था म्हणून बसकर पट्ट्यांचे वाटप करण्यात आले. फाउंडेशनच्या महिला अध्यक्षा ज्योतीताई साळुंखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी शाळेत विद्यार्थ्यांसमवेत ज्योती साळुंखे यांचा वाढदिवस साध्या व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक आष्पाक, आत्तार, सचिन पाटील यांच्यासह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याची त्यांची भावना प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले .त्यावेळी माणुसकी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक टकले, दत्तात्रय साळुंखे, लक्ष्मी टकले, प्रा. विनय कैंगार उपस्थित होते.










मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६

६१) **मा.श्री. महेश गारगोटे साहेब उपआयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालीका** यांची सदिच्छा भेट घेतली. व साहेबांनी माणुसकी फौंडेशन च्या सामाजिक कामाची दखल घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.









